|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय

जा.क्र. कबचौउमवि/08/205/2025 दिनांक 01.04.2025
02.04.2025

## परिपत्रक

**प्रति,**

***कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच संस्थांचे मा.संचालक .....***

**विषय :-** विद्यापीठ निधीतून प्राप्त रक्कमेअंतर्गतची देयके विद्यापीठास जमा करुन पारीत करणेबाबत .....

**महोदय/महोदया,**

वित्त विभागामार्फत संलग्नीत महाविद्यालये/ संस्थांना, विद्यापीठामार्फत राबविण्यात येणा-या विविध प्रयोजनांकरिता संबंधित विभागांच्या शिफारशीने मा.कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनुसार अग्रीम/अनुदान देण्यात येते. सदर अग्रीम हा वार्षिक, एखादी विशिष्ट घटना/ कार्यक्रमासाठी देण्यात येत असतो व तद्नंतर त्याचे देयक सादर करुन समायोजन करावयाचे असते.

त्याचप्रमाणे वार्षिक अग्रीमाव्यतिरिक्त, एखादी विशिष्ट घटना/ कार्यक्रमासाठी अग्रीम देण्यात आला असल्यास, अशा अग्रीमाची देयकेदेखील विहीत कालमर्यादेत समायोजित होणे आवश्यक तथा क्रमप्राप्त आहे. तसेच एखाद्या विशिष्ट घटना/ कार्यक्रमासाठी अग्रीम देण्यात आला आहे, परंतु ती घटना/ कार्यक्रमच झाला नसल्यास, सदर प्रयोजनासाठी घेतलेला अग्रीम विहीत मुदतीत विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, 2016 मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार तसेच समान लेखा संहितेतील तरतुदीनुसार विद्यापीठाचा ऑडिट रिपोर्ट 31 जुलै पर्यंत अंतिम होणे आवश्यक तथा बंधनकारक असून, तत्पूर्वी, 31 मे अखेरपर्यंत आवश्यक ते व्हाऊचर्स व संबंधित फाईल्स संबंधितांकडून प्राप्त करुन घेणे, त्रुटींचे निराकरण करुन, त्यावर समायोजनाबाबतची अंतिम कार्यवाही करणे, सॅप सिस्टीममध्ये नोंदी घेणे आवश्यक ठरते.

विद्यापीठ अधिनियम तसेच समान लेखा संहितेत उपरोक्त नमूद केलेली तरतूद तसेच कालमर्यादा लक्षात घेता, आपल्याकडील आर्थिक वर्ष 2024-25 करिताची संबंधित व्हाऊचर्स व फाईल्स कोणत्याही परिस्थितीत 30 एप्रिल पर्यंत वित्त विभागात समायोजनासाठी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रयोजनाकरिता दरवर्षी वित्त विभागाव्दारे यासंदर्भात परिपत्रक निर्गमित करण्यात येते तसेच त्यानंतर स्मरणपत्रान्वयेदेखील याबाबत सूचित करण्यात येते. तथापि, सदरबाबतीत विहीत कालमर्यादेत व्हाऊचर्ससह फाईल्स जमा होत नसल्याबाबत विद्यापीठाच्या ऑडिट रिपोर्टमध्ये याबाबत वारंवार शेरा देण्यात येत आहे.

तरी उपरोक्तबाबत विहीत मुदतीत कार्यवाही होण्याच्यादृष्टीने कृपया खालीलप्रमाणे कार्यवाही करावी, ही विनंती.

1) राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभाग व विद्यार्थी विकास विभागामार्फत राबविल्या गेलेल्या कार्यक्रमाचे बिल, खरेदी अथवा अन्य बिलांचे ऑडिट करणेसाठी जी तारीख सूचित करण्यात आलेली आहे, त्याच तारखेस त्याचे ऑडिट करण्यात यावे, ही विनंती.

2) ज्या कार्यक्रमांचे विद्यापीठ ऑडिट झालेले नाही, अशी सर्व बिले/देयके आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबंधित विभागांना दिनांक 20 एप्रिल, 2025 पर्यंत सादर करावीत, जेणेकरुन संबंधित विभागामार्फत त्याची पडताळणी करण्यात येऊन, अशी बिले/ देयके दिनांक 25 एप्रिल, 2025 पावेतो अदायगीसाठी वित्त विभागास प्राप्त होतील.

3) दिनांक 30 एप्रिल, 2025 नंतर येणा-या सर्व बिले/ देयकांची अदायगी करतांना 10 % दंड आकारण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

4) ज्या प्रयोजनासाठी विद्यापीठाकडून रक्कम प्राप्त झाली असेल, मात्र ते प्रयोजन काही कारणाने झालेच नसेल, तर ती रक्कम विद्यापीठास परत करणे अनिवार्य असून, दिनांक 25.04.2025 पर्यंत अशी रक्कम विद्यापीठ खात्यात भरणा करावी.

तरी उपरोक्तबाबत विहीत मुदतीत कार्यवाही करुन वित्त विभागास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला स्नेहांकीत,

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:- नियंत्रक अधिकारी आणि संबंधित कर्मचारी (बिल पासिंग युनिट), (अग्रीम युनिट), कॅश काऊंटर, वित्त विभाग, कबचौउमवि, जळगाव.